महाराष्ट्र शासन

क्र : कृषिआ-३३१८/प्र.क्र.२३१/१६अे

कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व
मत्स्यव्यवसाय विभाग,
शिबीर कार्यालय, नागपूर
दि. ०७.०७.२०१८

प्रति,

आयुक्त (कृषि),
कृषि आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :-** महाराष्ट्र कृषि सेवा गट ब ( कनिष्ठ ) संवर्गातील अधिकाऱ्यांची दि.०१.०१.२००४ स्थित अंतिम जेष्ठता सूची प्रसिध्द करणेबाबत.

महोदय,

महाराष्ट्र कृषि सेवा गट ब (कनिष्ठ) संवर्गातील अधिकाऱ्यांची दि.०१.०१.२००४ स्थित अंतिम जेष्ठता सूची प्रसिध्द करण्यास शासन मान्यता प्राप्त झालेली आहे. याबाबतचे दि.०७.०७.२०१८ रोजीचे शासन परिपत्रक सोबत जोडले आहे. सदर शासन परिपत्रक कृषि विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची आपणांस विनंती आहे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास तात्काळ सादर करण्यात यावा.

आपली,

(ज्योत्स्ना अर्जुन )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत, माहिती व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित-
सहसंचालक ( आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे

F:\2018\Letter.docx

महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील कृषि अधिकाऱ्यांची दिनांक ०१.०१.२००४ स्थित अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन परिपत्रक क्र.कृषिआ-३३१८/प्र.क्र.२३१/१६ अे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दि. ७ जुलै, २०१८

वाचा :-शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. आकृवि १२०९/ प्र.क्र.१५१/१५अे, दिनांक १५.०४.२००९

परिपत्रक

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील कृषि अधिकाऱ्यांची दि.०१.०१.२००४ स्थित अंतरिम सामायिक ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. उपरोक्त दिनांक ०१.०१.२००४ स्थित अंतरिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द केल्यानंतर या संवर्गातील अधिकाऱ्यांकडून प्राप्त आक्षेपांनुसार ज्येष्ठतासूची मध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदर ज्येष्ठतासूची खालील अटींच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे:

अ. ज्येष्ठतासूचीमध्ये प्रस्तावित करण्यात आलेले मानीव दिनांक हे फक्त सेवा ज्येष्ठतेसाठी प्रस्तावित आहेत. पदोन्नती ही सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार असल्याने केवळ ज्येष्ठतेसाठी मानीव दिनांक प्राप्त झाला म्हणून पदोन्नतीसाठी पात्र आहे असे गृहीत धरुन, त्या अनुषंगाने कोणतेही लाभ देय राहणार नाहीत.

ब. जे अधिकारी विहीत मुदतीत विभागीय लेखा परीक्षा उत्तीर्ण न होता उशिरा उत्तीर्ण झालेले आहेत अशा अधिकाऱ्यांची ज्येष्ठता ही सदर बदलाच्या अधीन राहील.

क. सदरची ज्येष्ठतासूची महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवाज्येष्ठतेच्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाकडील याचिका क्र.२७११७/२००८ व याचिका क्र.५२०२/२००९ च्या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. आयुक्त (कृषि) यांनी सदर अंतिम ज्येष्ठतासूची सर्व संबंधीत महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या (रजेवर/प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांसह) निदर्शनास आणावी.

४. प्रस्तुत शासन परिपत्रक कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु.सं.धपाटे )
शासनाचे उप सचिव

सोबत : प्रपत्र-अ

प्रति,

१. आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. सर्व विभागीय कृषि सहसंचालक द्वारा आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. सहसंचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय,पुणे.
४. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, द्वारा आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
५. सर्व तालुका कृषि अधिकारी, द्वारा आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
६. सर्व संबंधित अधिकारी, द्वारा आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
७. उपसचिव (१६ अे कार्यासन) यांचे स्वीय सहाय्यक,कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई.
८. निवडनस्ती,१६ अे कार्यासन.